Vol 3 Issue 8 Sept 2013

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.



## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra



**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-8, Sept-2013
ISSN 2230-7850

Available online at www.isrj.net

# महायुध्दोत्तर वास्तववादी मराठी कादंबरी

**संजय पांडुरंग नगरकर**

एम. ए., एम. फिल., पीएच. डी., सेट सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख, राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर

***सारांश :***

***(1) युध्दपूर्व कादंबरीचे स्वरूप –***

मराठी कादंबरीच्या संदर्भात विचार करता संपूर्ण वास्तववादाचा पूरस्कार करणारी व वास्तववादाचे दर्शन घडविणारी कांदबरी सापडणे तसे दुर्मिळच. कारण येथील वाङ्मयीन मूल्ये व वास्तववादाविषयी असलेले गैरसमजच यास काणीभूत आहेत. काहींनी फक्त एक टूम म्हणून वास्तवाचा आधार घेऊन अवास्तवच चित्रण केले तर काहींनी वास्तवाचा फक्त आभास निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. अर्थात ही कोंडी फोडण्याचा प्रयत्न महायुध्दोत्तर कादंबरीकारांनी केलेला दिसतो. महायुध्दोत्तर कादंबरी वाङ्मयाचा विचार करता मराठी साहित्यविश्वासत एक नवे स्थित्यंतर घडू लागल्याचा प्रत्यय येतो. बदलती जीवनमूल्ये व त्या पार्श्वभूमीवर नवलेखकांना जाचक वाटणारी पूर्वकालीन वाङ्मयीन मूल्ये यांच्या संघर्षातून मराठी कादंबरी एक नवे तेज घेऊन प्रकट झालेली दिसते वेगवेगळया रूपात तिने वास्तववादी भूमिका घेतलेली दिसते.

***प्रस्तवाना :***

अर्थात मराठीतील वास्तववादाचा पुरस्कार करणारी पहिली कादंबरी ह.ना. आपटयांच्या नावावर जमा झालेली दिसते. त्या अगोदर बाबा पद्मनजींच्या 'यमुनापर्यटन'(1857) या मराठीतील कादंबरीत बाबा पद्मनजी वास्तववादाचा उगम म्हणून ओळखले जातात. त्या वास्तववादाचा 'प्रचार' ही मर्यादा आहे. त्या प्रचाराच्या हेतूखातर सगळाच वास्तववाद गुंडाळून ठेवण्यास बाबा तयार असतात. '1 पुढे बोधवादी वाङ्मय रंजनाच्या हातात हात घालून वासतवाचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न करतांना दिसते. आपण वास्तववादाचे पुरस्कर्ते असून आपण मांडलेले प्रश्न, केलेले चित्रण अगदी खरे आहे असा या बोधवाद्यांचा दावा असतो. या भ्रमक समजुतीमुळे हे कादंबरीकार रंजनात्मक कादंबरीप्रमाणेच जीवविन्मुख झालेले दिसतात. अर्थात काळ कोणताही असो, 'करमणूक करणाऱ्या वाङ्मयाला कोणतयही समाजात सदैव फार मोठा वाचक वर्ग उपलब्ध असतो.'2 त्यामुळे अशा कादंबऱ्या पुढे देखील लोकप्रिय राहिलेल्या दिसतात. रिसबुडांच्या 'मुक्तामाले'पासून हा प्रवास सुरू होतो (1861) तो पुढे हळबे – रिसबूड – जोरवेकर – फडके – खांडेकर – माडखोलकर – भावे – रेगे – खानोलकर – रंगनाथ देशपांडे – माधव कानिटकर – काकोडकर – योगिनी जोगळेकर – कुसुम अभ्यंकर – चंद्रकांत खोत – बाबा कदम अशी आजपर्यत ही रंजनवादी कादंबरीची वाटचाल झालेली दिसते. यातील काही लेखकांनी वास्तवाचा फक्त आभास निर्माण करण्यासाठी विस्तृत वर्णने, व्यक्तिचित्रे, घटना–प्रसंग चित्रणे केलेली दिसतात. 'मराठीतील वास्तववादाचे पोषण ह्यााच परंपरेमुळे झालेले दिसत नाही.'3 याच परंपरतेतून पुढे आलेले व आपल्या स्वतंत्र प्रतिभेने मराठी कादंबरीच्या शिखराव विराजमान झालेले ह. ना. आपटे हे एक युगकर्ते कादंबरीकार बाह्याता ते ध्येयवादी सुधारणावादी कादंबरीकार होते, तर अंतर्मनात ते वास्तववादी कलावंत होते. तसेच त्यांची नवीन क्रांतिकारक कामगिरी तयंच्या सुधारणावादात नव्हती तर त्यांच्या वास्तववादात होती. असंभाव्य आणि ओबडधोबड कथानकाचा काळ संपवून संभाव्य, सुव्यवस्थित आणि स्वाभाविक कथानकाचा काळ सुरू करणे ही हरिभाऊंची खरी कामगिरी होय. शैलीतील साधेसोपेपणा, वर्णनातील प्रत्यक्षसदृश्यता व तपशीलवारता व बोधवादाकडून कलात्मकतेकडे होणारा त्यांचा प्रवेश त्यांच्या कादंबरी वाङ्मयाला जिवंतपणाकडे घेऊन गेला. त्यानंतरचे युग हे त्यांच्या नावानेच ओळखले जाते. अर्थात पुढे ह.ना. आपटे ऐतिहासिक विषयाकडे वळले व फक्त वास्तवाचे अभासात्मक वित्रण करण्याच्या नादात गुरफटले. त्यांनतर वास्तववादी कादंबरीची स्थिती जवळजवळ दुसऱ्या महायुध्दोत्तर कालापर्यंत क्षीणवत स्वरूपाचीच दिसते. थोडाफार प्रयत्न पुढे वा.म. जोशी, श्री.व्यं.केतकर, साने गुरूजी, विभावरी शिरूरकर, भाऊ पाध्ये आदींनी केल्याचे दिसते.

मराठी कादंबरीच नव्हे तर एकूण साहित्य विश्वाला आलेली मरगळ दूर करण्याचा, तंत्रवादाचे रंजनवादाचे स्तोम मोडण्याचा प्रयत्न केला तो खऱ्या अर्थाने महायुध्दोत्तर पिढीने. मराठी कादंबरीत आलेले साचलेपण प्रवाही करण्याचा, वास्तववादी परंपरेचा खरा अभ्युदय व विकास करण्याचा प्रयत्न केला तो या महायुध्दोत्तर कादंबरीकारांनीच. आणि हे सर्व घडण्यामागे तशी पार्श्वभूमीही कारणीभूत होती.

***(2) महायुध्दोत्तर वातावरणाची पार्श्वभूमी –***

1939 ते 1945 असे सलग सहा वर्षे जे दुसरे महायुध्द झाले, त्याचे चटके फक्त भारतालाच नव्हे तर सर्व जगालाच बसले. माणसाच्या माणुसकीवरील विश्वास उडविणाऱ्या या अंतिसंहारक अशा महायुध्दामुळे मानवी मूल्यांचा ऱ्हास होतो की काय अशी विदारक स्थिती निर्माण झाली. सर्वत्र हाःहाकार माजलात्र जुनी मूल्ये जाऊन नवी मूल्ये प्रस्थापित होऊ लागली. त्यातच भारतीय स्वातंत्र्य लढा शेवटचे टोक गाठू लागला होता. सामाजिक–सास्कृतिक आणि राजकीय स्वरूपाचे ठळक बदल होत होते, आणि त्यातून एक वेगळे वातावरण निर्माण होऊ लागले होते.

बदलती सामाजिक मुल्ये आणि स्थितीशील वाङ्मयीन वातावरण यांचा ताळमेळ बसता नव्हता. बदलत्या जागाचे अनुभव मांडण्यात प्रस्थापित लेखक वर्ग अपुरा पडु लागला. नव्या पिढीतील लेखकांना ही जुनी वाङ्मयीन मूल्ये जाचक वाटू लागली. परिणामी त्यांची मोडतोड करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. त्यापाठोपाठच अनेक घटना एका मागोमाग एक घडत होत्या. भारत स्वतंत्र झाला होता, फ्राईडच्या नवमानसशास्त्राने एक वेगळीच क्रांती केली होती. राष्ट्रीय व प्रादेशिक अस्मिता, औद्योगिकरण व शहरीकरण झपाटयाने वाएू लागलेले, त्यातूनच संप्पन्नतेच्या जोडीला बकाली–जीवन, मूल्यहीनता, भ्रमनिरास, संतत्प वृत्ती वाढू लागलेली. दुसऱ्या बाजुने ग्रामीण जीवनही नव्या प्रवाहाशी जोडले जाऊन नव्या समस्येत अडकू लागलेले. उपेक्षित वर्ग नव्या उमेदीने पुढे येऊ लागला होता. समाज जीवनाशी संबंधित सर्वच क्षेत्रातील प्रस्थापितांची मिरासदारी संपुष्टात आली. एका बाजूला मानवी मनाची गहनगूढता लक्षात आलेली, तर दुसरीकडे मार्क्सवादी चिंतनातून वर्ग संघर्षाचे भान व सामाजिक प्रतिबध्दता याची दखल घेतली जाऊ लागलेली. आजवरच्या पांढरपेशी अभिरूचीचा विस्तार होऊ लागला आणि ग्रामीण आणि नागर अभिरूचीची समस्या निर्माण झाली. 'या साऱ्याचा परिणाम मराठी कादंबरीवर झाला आणि त्यातून एक नवे रूपरंग सिध्द झाले. मराठी कादंबरीतून नवी संवेदनशीलता प्रकट होऊ लागली. तिची कुतूहलक्षेत्रे बदलली. लेखनादर्श बदलले. वेगळी साध्ये तिला दिसू लागली.'4 हे सर्व जरी खरे असले तरी जुन्या प्रवृत्ती पूर्णपणे नष्ट झाल्या नाहीत. कारण, या प्रवृत्ती प्रत्येक काळात अल्पाशांने का होईना टिकून राहिलेल्या असतात मराठी कादंबरी विश्वातही रंजनाची प्रेरणा, अद्भुतरम्यतेची प्रेरणा, बोधवादाची प्रेरणा वास करताना दिसते. कादंबरीची मांडणी फक्त बदलली, पूर्णपणे स्थित्यंतर झाले नाही. रंजन व उद्बोधन ही सर्वकालीन समाजमनाची एक गरज राहिलेली दिसून येते. त्यातच जुन्या पिढीतले लेखक हे बदलते जीवन एकाच ठरलेल्या साच्यातून बाहेर काढीत होते. बदलत्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर हे सामर्थ्य त्यांना पेलले नाही. नवपिढीतील लेखक वर्गाची इथे कोंडी झालेली होती, भोवतालचे जग व आपणाला आलेले अनुभव जसेच्या तसे चित्रित करताना परिणामी त्यांना सर्वच प्रकारची मोडतोड करावी लागली. अर्थात त्यासाठी त्यांना परंपरेचा आधार ही घ्यावा लागला. काहींनी पूर्णपणे परंपरा नाकारण्याचा प्रयत्न वास्तववादाला वेगवेगळी परिमाणे मिळू लागली. वेगवेगळया स्वरूपात तो कादंबरीतून येऊ लागला.

### *(3) वास्तववादी कादंबरीचा अभ्युदय व विकास –*

'यमुना पर्यटन' पासून सुरू झालेली वास्तववादी कादंबरीची परंपरा या काळात वेगळेच, प्रगल्भ असे रूप घेऊन आलेली दिसते. मराठीतील वास्तववादाची पिछेहाट इथून पुढे खऱ्या अर्थाने थांबली असेच म्हणावे लागेल. कवितेच्या क्षेत्रात बा.सी. मर्ढेकर व कथेच्या क्षेत्रात गंगाधर गाडगीळांनी जो नवसाहित्याचा पायंडा पाडला, तसा कादंबरीबाबत कुणा एकाचे नाव घेता येणे तसे अशक्य आहे. अवती भोवतीचे जग वेगाने बदलत असताना, सामाजिक वास्तवाला पेलण्याचे सामर्थ्य असलेला एक प्रमुख साहित्य प्रकार म्हणून मराठी कादंबरीने हे आव्हान कितपत स्वीकारले हा प्रश्न आपल्या समोर उभा राहतो. त्या संदर्भात वास्तवाचा आविष्कार करून वेगवेगळया कादंबरी प्रकारांनी हे आव्हान पेलल्याचे दिसते. त्यामुळे वास्तववाद विविधतेने कांदबरीतून आविष्कृत झाला असल्याचे आपणास दिसून येईल.

अर्थात काहींच्या कादंबरीमध्ये वेगवेगळया प्रेरणा प्रवृत्तींचे मिश्रण झालेले दिसते. उदा. खानोलकरांच्या कादंबरीलेखनामागे रोमँटिक प्रेरणाप्रमुख असली तरी, वास्तववादी आणि व्यस्ततावादी प्रेरणांचा स्पर्शही त्यांच्या कादंबऱ्यात दिसून येतो. तसेच श्री.ना. पेंडसेंच्या कादंबरीतील वास्तववाद रोमँटिक प्रेरणांना जवळ करीत रंजनाकडे झुकताना दिसतो. मात्र व्यंकटेश मांडगुळकरांसारख्या लेखकाच्या लेखनात वास्तववादाची पूर्णतः कास धरलेलीही दिसते. असा हा वास्तववादी कादंबरीच्या नवप्रवर्तनाचा व विकासाचा काळ आहे. त्यातल्या त्यात 1960 नंतर तर वास्तववादी प्रवृत्तीचा आज सर्वात अधिक विकास झालेला दिसतो. हे वास्तववादाची मराठीतील दुर्दशा संपत आल्याचे चिन्ह मानता येईल.'5 वास्तववाद कसा वेगवेगळया स्वरूपात इथून पुढच्या कादंबरीतून प्रवास करताना दिसतो हे आपणास सविस्तर पाहता येईल.

### *(3:1 )ग्रामीण व प्रादेशिक कादंबरी –*

ग्रामीण, प्रादेशिक कांदबऱ्यांमध्ये माणूस, माती आणि निसर्ग यांच्या गहिऱ्या भावसंबंधाचे दर्शन घडते. तसे पाहता प्रत्येक कादंबरीत कोणता ना कोणता प्रदेश, निसर्गवर्णने ही येतातच, परंतु या कादंबरी प्रकारात येणारा निसर्ग व प्रदेश हा अनुभवाचा अविभाज्य भाग म्हणून येतो. स्वतःचे व्यक्तिमत्त्व घेऊन येताना दिसतो. केवळ रूचीपालट म्हणून वा टूम म्हणून येत नाही. तसे कोणत्याही वाङ्मय प्रकारात काही नवक्रांती झाली तर, त्याची एक टूम बनते हा भाग वेगळा. ग्रामीण व प्रादेशिक कादंबरी संदर्भातही हा प्रकार काही काळाने झाला. यादव–बोराडे हा या प्रकारातील महायुध्दोत्तर काळातील प्रमुख टप्पा. लेखक ज्या प्रदेशात जगला, वाढला, तिथली माणसं, निसर्ग जो त्याला भावला, त्या परिसराला रूपगंधासह, त्यातील नाट्यामय, उभ्या–आडव्या, बऱ्या–वाईट जीवन नाटयास जिवंत करण्याची उत्कटता या कादंबऱ्यातून केलेली दिसते. यादव–बोराडेंनी संपूर्ण प्रादेशिक बोलीचा वापर करून प्रादेशिक कादंबरीला नवे परिणाम दिले. पेंडसे–दांडेकरांच्या कादंबऱ्यातील कोकण, माडगुळकरांच्या कादंबरीतील माणदेश, शेळक्यांच्या वऱ्हाड, यादवांच्या पश्चिम महाराष्ट्रीय, प्रदेशाला त्या त्या भागातील बोलींसह जिवंत केलेले दिसते. इतर प्रकारच्या लेखनापासून असलेले एक वेगळेपण म्हणून हे आपण लक्षात पाहिजे.

श्री.ना. पेंडश्यांच्या कादंबरीतील जीवनाचे नाट्याात्मक दर्शन व हर्णेच्या परिसरातील जीवन त्यांनी समर्थपणे चित्रित केलेले दिसते. त्यांची 'लव्हाळी' आणि 'आक्टोपस' या कादंबऱ्या वगळता 'एलगार', 'यशोदा', 'गारंबीचा बापू', 'हत्या', 'कलंदर', 'रथचक्र' या महत्त्वपूर्ण कादंबऱ्यांना हर्णेच्या परिसराचा परिसस्पर्श झालेला आहे. त्यांच्या कादंबऱ्यातून भेटणारी माणसे जिवंत, मानवी वाटतात. 'गारंबीचा बापू' मधील आफाट बापू असो, 'हद्दपार' मधील करारी व खानदानी राजे मास्तर असो, 'रथचक्रा'तील जिवाचे रान करून पोटच्या पोराला उभे करणारी व नियतीपुढे हतबल ठरलेली स्त्री असो, उत्कटतेने प्रेमाचा वर्षाव करणारी सुंदर राधा असो, भूतवाडीची मावशी असो, वा वांझपणाचे ओझे सतत डोक्यावर घेणारा विठोबा असो, सरळपणाचे ढोंग करणारा पण वाकडी चाल चालणारा बेरकी अप्पा खोत असो, माणसं अगदी गुण–दोषांसह येतात आणि आपल्या जीवन प्रवाहात जिद्दीने उभी राहतात. पेंडश्यांनी आपल्या कादंबऱ्यातून वास्तववाद आणि रोमँटिसिझम यांचे मिश्रण केल्यामुळे त्यात गहिरेपणा येऊ शकला. माणसाच्या अंतर्बाह्या वासतवातले नाटय अगदी नेमकेपणाने व बारकाव्याने, त्या त्या पात्र प्रसंगांशी तादात्म्य पावून चित्रित करून पेंडश्यांनी आपल्या लेखनाला वेगळया आणि नव्या टप्प्यावर नेऊन ठेवले. अर्थात पेंडश्यांच्या कादंबऱ्यांचे मध्यवर्ती केंद्र हे रंजनवादी प्रेरणेने भारलेले दिसते. 'रथचक्र'सारख्या कादंबरीत त्यांनी नियतीचे परंपरेने मान्यता पावलेले सामर्थ्यच मान्य केले आहे. यापुढे तुंबाडचे खोत लिहून त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करण्याचा अयशस्वी प्रयत्न केलेला दिसतो.

व्यकटेश माडगूळकरांनी आपल्या कादंबऱ्यातून जगण्याचा वास्तववादी वेध घेण्याचा प्रयत्न केला. त्यांची 'बनगरवाडी' ही एकूण मराठी कादंबरी लेखनाचा एक सहजसुंदर आविष्कार आहे. अस्सल, खराखुरा, जातिवंत अनुभव यातून प्रत्ययाला येतो. आडबाजूस असलेल्या व रक्तमांसाने तेथील परिसराशी एकरूप झालेल्या माणसांचे जिवंत दर्शन तिथल्या सामुहिक जीवन जाणिवांसह यात येते. 'वावटळ' (1964) सारख्या कादंबरीतून गांधीवधानंतर झालेल्या ग्रामीण भागातील हाःहाकाराचे व तेथील सामाजिक–सांस्कृतिक परिस्थितीचे तटस्थपणे परंतु भेदक असे चित्रण येते. 'सत्तांतर' (1962) द्वारे लेखक लोक जीवनाकडून वन्य जीवनाकडे वळतात. एका वानर जातीतील सत्तांतर त्यांनी प्रतीकात्मक पध्दतीने जगण्यातल्या मुलभूत व आदिम प्रेरणांचाच वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. 'माणसाचे स्वतःशी, निसर्गाशी आणि समाजाशी असलेले अनुबंध या कादंबऱ्यातून माडगूळकर नेमकेपणाने दाखवून देतात आणि माणुसकीचा गहिवर निर्माण करतात.'6 'बनगरवाडी' मध्ये रानाचा वास्तव स्पर्श मराठी कादंबरीला पहिल्यांदा झाला.

रा.रं. बोराडे यांची 'पाचोळा' आणि आनंद यादव यांची 'गोतावळा' (1971) या कादंबऱ्यांचाही उल्लेख या संदर्भात करायला हवा. ग्रामसंस्कृतीवर झालेल्या आधुनिकिकरणाच्या, शहरीकरणाच्या आक्रमणामुळे ग्रामीण समाजजीवनावर जे आघात झाले त्याचे मार्मिक चित्रण या दोन कादंबरीकरांनी नेटकपणाने रंगवले आहे. आयुष्यभर काय पाचुळयावानी असं वाटणारा गंगाराम शिंपी व पार्वती तिथल्या ग्रामीण बोलीसह आपणासमोर येते. तर 'गोतावळया' मधील शेतावर काम करणाऱ्या नारबाचे खाजगी आयुष्य आणि त्याचा शेती–शेतीवर राबणारी व पाळलेली जनावरे यांवरील लळा यांचे भावविश्व साकारले आहे.

या सर्व कादंबऱ्यांप्रमाणेच 'फकिरा' (1959), 'चक्र' (1963), 'माहिमची खाडी' (1969), 'गांधारी' (1973) या कादंबऱ्यांमधील स्थानप्रधान प्रवृत्तीचे समस्या प्रधान पोट समूह प्रधान अशा वास्तव प्रवृत्तीचे जवळचे नाते दिसते. ट्रॅक्टर आल्यावर काय करायचे हा नारबाचा प्रश्न (गोतावळा), दुष्काळ पडल्यावर बदली (बनगरवाडी), झोपडपट्टी उठली पुढे काय (चक्र), पिढीजात चोऱ्या करणाऱ्या उपाशी उपेक्षितांनी धान्य लुटले, हे अपरिहार्य आहे, तसेच समाजात कायदा–सुव्यवस्था वगैरेसाठी पोलीसांनी त्यांना पकडून डांबावे की नाही (फकिरा) असे नैतिक प्रश्न यातून हाताळलेले असतात.

या प्रेरणेतून निर्माण झालेल्या कादंबरीने आपलय कक्षेतील वास्तवाचे जबरदस्त प्रांत उभारून पांढरपेशी–मध्यमवर्गीय शहरी अशा एकांतिक तंत्रवादी परंपरेला खुले केले. मराठी कादंबरीत रूजलेल्या अवास्तव आशयाला आव्हान दिले. मराठी कादंबरीच्या विकासात या कादंबरीला महत्त्वाचे स्थान आहे. मराठी वास्तववादावर साचलेली धूळ झटकण्याचे व अस्सल देशी परंपरेचे भान देणारी ही कादंबरी त्यामुळेच आपले स्वतंत्र स्थान टिकवून आहे.

### *(3:2 )उपेक्षितांचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या –*

महायुध्दोत्तर काळात ज्या घडल्या, जे बदल होऊ लागले त्यातून अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि ही विचारप्रणाली अंगीकारलेल्या लोकशाही गणराज्यात 'स्वातंत्र्य कुणा गाढवीचे नाव आहे', असा विद्रोही सूर निघू लागला. तळागाळातील वर्ग नव्याने शिकून जागृत होऊ लागला. या वर्गाचेही प्रश्न नव्याने पुढे येऊ लागले. महानगरांमधून उपेक्षित वर्गाला बकालपणाचे जीवन जगावे लागत होते, अशा या नरकाचे चित्रण करण्याचा प्रयत्न काही कादंबरीकरांनी केला. कृतिप्रधानतेने, वास्तवसन्मुख होणाऱ्या या कादंबरीने स्थानप्रधानतेच्या मर्यादा ओलांडून समूह मनाचे, त्यांच्या संस्कृतीचे चित्रण केले जाऊ लागले. भाषेसंबंधीचा हीनगंडही कमी–कमी होत चालला. 'इंधन', 'बळी', 'व्सती वाढते आहे', 'हातभट्टी', 'सुड' या सारख्या कादंबऱ्यांतून हे चित्रण साकार झालेले दिसते.

विभावरी शिरूरकरांच्या 'बळी' (1950) च्या रूपाने त्यांच्या व्यापक सामाजिक दृष्टिकोणाचा प्रत्यय घडवला. पावनगडच्या खोऱ्यातील पापासारखी ओवाळून टाकलेली मानवता आपणास यात दिसते. उपेक्षित वर्गाचे अंतरंग वमालीच्या हळुवारपणाने व सहानुभूतीने लेखिका चित्रित करताना दिसते. 'हातभट्टी' (1970) मध्ये खरातांनी झोपडपट्टीतल्या हालअपेष्टांची दर्दभरी कहाणी सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. 'सूड' (1969) सारख्या कादंबरीत बागूल वयात आल्यापासून पाशवी बलात्कार आणि मानसिक अत्याचार यामुळे सारे आयुष्य कुस्करलेल्या जानकीची हकीगत सांगतात.

दुःखाचे प्रचंड अनुभव पाठीशी असणारा या वर्गातील लेखकही तसे पाहता वास्तववाद फारसा पेलू शकत नाही. वास्तववादी लेखनाची फार मोठी अपेक्षा या वर्गाने निर्माण केली होती. परंतु अखेर हे लेखकही रोमँटिकतेकडे झुकलेले दिसतात. वास्तववादाचे धनुष्य यांना पेलावले नाही आणि परिणामी हेही रोमँटिक दृष्टितून इथे सामोरे आल्याचे दिसते. उपेक्षितांचे जीवनवास्तव मांडणारे यातले काही लेखक प्रत्यक्ष तो अनुभव घेतलेले नसले तरी, त्यांनी उपेक्षितांची रेखाटलेली चित्रे वास्तवाच्या पातळीवर जातात. अर्थात मुळातला रोमँटिसिझम

आधेमध्ये डोके वर काढीत राहिल्याने हा वास्तववाद फारसा रूजू शकला नाही. 'दलित साहित्य' म्हटल्या जाणाऱ्या प्रवर्गातील लेखकही कादंबरीच्या बाबतीत वासतववादाचा अंगीकार फारसा करू शकला नाही. त्यामुळे वास्तववादाच्या फार मोठया अपेक्षा बाळगून असणाऱ्या या वर्गातील कादंबऱ्यांनीही अखेर अपेक्षाभंग केल्याचे दिसते.

### *(3:3 )मनोवास्तवाचं चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या –*

फ्राईड, युंगच्या मानसशास्त्रीय संशोधनामुळे काही काळ मराठी साहित्यविश्वातही खळबळ उडविली. मानवी मनातील तरल व हळुवार संवेदना टीपण्याचा प्रयत्न काही लेखकांनी केली. कादंबरीच्या क्षेत्रात विश्राम बेडेकरांच्या 'रणांगण', रेग्यांच्या काही कांदबऱ्या उदा. 'सावित्री' मधून मानवी मनातील मळुवार भावना मांडण्याचा, नेणिवेच्या पातळीवरील मानवी मनाचे वास्तव विश्व उघडे करण्याचा प्रयत्न या लेखकांनी केला. परंतु अखेर हे लेखक रोमँटीसिझमच्याच आहारी गेल्याचे दिसते. या वर्गातील लेखक मध्यमवर्गीय – पांढरपेशा गटातील असल्याचे बहुतांशी दिसते. बदलत्या परिस्थितीत मानवी मनाची होणारी ओढाताण, ताणे–बाणे, शहरी जीवनामुळे आलेली निराशा, तत्कालीन मनोवस्था चित्रित करण्याचा वास्तववादी प्रयत्न केला गेला. परिपूर्ण होण्यासाठी आत्मविसर्जन करण्याची ओढ असणारी रेग्यांची 'सावित्री' ही शेवटी बिनामध्ये हे विसर्जन होण्याने समाधान पावते आणि आलेली परिस्थिती विना तक्रार स्विकारते यामागे असणारा तिचा दैववाद हा भारतीय परंपरेचा संदर्भ स्पष्ट करतो. हा संदर्भच या कादंबरीला एका वास्तववादातून दुसऱ्या वास्तववादात नेतो, 'सावित्री' आलेली परिस्थिती मोकळया मनाने स्वीकारते हे भारतीय परंपरेतील वास्तववादाचेच उदाहरण होय. अर्थात रेग्यांची एकूण शैली, स्वप्नरंजनात गुतण्याची सवय ही आधुनिक वास्तववादाला मारकच ठरलेली आहे. पुढे भालचंद्र नेमाडयांच्या 'कोसला'तील पांडुरंग सांगवीकर या भाबडया पण संवेदनक्षम आणि चिंतनशील तरूणाच्या जगाविषयीच्या आकलनातून वासतव आणि श्रध्दा यांची चमत्कारिक सांधेजोड करण्याच्या नादात गोंधळात पडलेल्या मनाची भवस्थिती समोर येते. यातून साकार झालेला हा नयक म्हणजे एक 'ॲबसर्ड मॅन' म्हणूनच पुढे येतोत्र ग्रामीण आणि नागर जीवनातले सारे सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक आणि तात्त्विक संदर्भ इथे एकवटून येतात. मराठी कादंबरी विश्वात मन्वंतर घडविणाऱ्या या कादंबरी संदर्भात, 'हळव्या माणसाचे वासतव चित्रण आणि चित्रणातील हळवेपणा यातील फरक जर आपण ओळखला तर नेमाडेंनी 'कोसला' अतिशय जिवंत व उत्कट केली आहे हे मान्य करावे लागेल.'7 हे नरहर कुरूंदकरांचे उद्‌गार यथार्थ ठरतात. 1960 नंतर बदललेल्या सामाजिक, साहित्यिक वातावरणामध्ये आलेली अर्थशून्यता मांडण्याचा प्रयत्न करणाऱ्या, एका प्रचंड दडपणाखाली दबल्या जाणाऱ्या माणसाचं भावविश्व मांडणाऱ्या ज्या कादंबऱ्या पुढे निर्माण झाल्या आणि मराठी वास्तववादाला जे नवे धुमारे फुटू लागले त्याचा हुंकार 'कोसला'च्या रूपाने झाला. त्यूपर्वी खानोलकरांच्या 'कोंडूरा' ने जी काही मानवी जिवनाच्या व्यर्थपणाची जाणीव ही प्रतिष्ठित वर्गातील मूल्यांचा व्यर्थपणा आणि व्यक्तिमनाची विकृती यांचा दुवा जोण्याचा यशस्वी प्रयत्न केला. एका बाजूला गूढ, एकाटू भव्य आणि उग्र व तटस्थ असणारा समुद्रा काठचा डोंगराचा कडा आणि दुसऱ्या बाजुने कामगंड आणि भयगंड या दोन्हीच्या चमत्कारिक मिश्रणामुळे पछाडलेला मानवी, विकृत परशुरामतात्या यांची भावचित्रे ही एका वास्तवात बांधण्यात खानोलकर यशस्वी होतात. अशा या मानवी भावविश्वातल नेणिवांना हात घालणाऱ्या कादंबऱ्यांनी काही प्रमाणात वास्तववादाचा सूर धरण्याचा प्रयत्न केला. काही त्यात यशस्वी झाले तर काही अखेरीस रोमँटीसिझमकडेच वळले.

### *(3:4 )सामाजिक वासतवाची दाहकता मांडणाऱ्या कादंबऱ्या –*

1960 नंतर मात्र वासतवतेची भरभराट करणाऱ्या नव्या कादंबरीने प्रमाणभाषेची बथ्थड परंपराही मोडून टाकली. 'एका महत्त्वाच्या वाङ्‌मयीन परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाल्याचे आढळते. भाऊ पाध्ये, किरण नगरकर, व ह. पिटके, ह.मो. मराठे, मनोहर शहाणे, बाबूराव बागूल यांच्या लेखनाची वैशिष्ट्यो निराळी असली तरी या सर्वांमधून मुळात विलग, खंडित असणारी वास्तववादी परंपरा पुन्हा केंद्रीभूत होऊ पाहत आहे.'8 नेमाडयांनी आपल्या कादंबऱ्यातून वास्तववादी पुनर्रउभारणी केल्यांनतर या वास्तववादाने व्यक्तिच्या अंतर्मुखतेची तसेच सामाजिक आत्मपरिक्षणाची व उलटतपासणीची परिमाणे दिली. त्यात एक प्रकारची प्रखर, कठोर जीवनसन्मुखता आहे. मराठी कादंबरीच्या जन्मापासून होत आलेली वासतववादाची पिछेहाट थांबल्याचे हे चिन्ह होते. येथून पुढे मराठी कादंबरीचे नवे आवर्तन सुरू झाले.

नेमाडयांच्या व्यस्ततावादी जीवनदर्शनाने एक नवी वाट दाखवून दिल्यानंतर, त्यावरून जाताना नवे लेखक काहीसे अडखळले असले तरी, सामाजिक वासतवाच्या दाहकतेवर आणि त्यातून निर्माण होणाऱ्या बधिरता व भ्रमनिरासावर त्यांनी नेमके बोट ठेवले. प्रस्थापित जीवनाबदद्लचा उबग, वैताग (वैतागवाडी), सिकनेस (होमसिक ब्रिगेड), भंकसपणा (वासूनाका) हताश आणि निराशावादी दृष्टी (निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी), अर्थशुन्यता (सात सक्कं त्रेचाळीस), एकाकीपणा (बखर एका राजाची, रोबो), मर्त्यता (सारे प्रवासी घडीचे), वासना विकृती (स्वगत, लिलीचे फूल), सिनिसिझम (पुत्र) अशा काही आधुनिक जीवनातील विषयांबरोबरच लौकिक जीवनातील आशद्रव्यातून विविध गटांच्या आकांक्षा भाषिक कृतींद्वारे साकार झालेल्या दिसतात. त्यात रिक्षावाले (माणूस), कामगार (डोंबाऱ्याचा खेळ, करंटा), कारकून (वैतागवाडी), मवाली, बोकर मुले (वासूनाका, सैनिक (रोबो), खेडवळ बायका (धग, माणूस), या पुरातन पोटसमूहांनी जोपसलेल्या बऱ्यावाईट तत्त्वांना नवदार्शन दिले गेले. वास्तवाची अपरिमित ओढ असलेल्या या कादंबऱ्यांतून क्वचित वास्तव व प्रत्यक्ष यातील सीमा ढासळून टाकल्या.

मुंबईसारख्या महानगरातून बकाल, अशिक्षित आणि बिनधास्त माणसांच्या वस्त्यांनजिकचे निर्ल्लज्ज, अनौपचारिक, उघ्डाडेनागडे आणि मूल्यशून्य जीवन भाऊ पाध्यांनी 'वासूनाका'तून मांडले. युनियनचे राजकारण आणि ते चालवणाऱ्या उच्चवर्गीयांच्या मनोवृत्तीला व त्यांच्या कार्यपध्दतीला तिरका छेद देण्योच काम 'डोंबाऱ्याचा खेळ'ने केले. 'वैतागवाडी'सारख्या कादंबरीत मध्यमवर्गीय माणसाला महानगरातून राहण्याच्या जागेचा प्रश्न कसा भेडसावतो याचे जिवंत चित्रण येते. 'बॅ.अनिरूध्द धोपेश्वरकरां'च्या उच्चवर्गीयांच्या ढोंगी जीवनाकडे पाहण्याचा डोळस परंतु रसहीन दृष्टीचा प्रत्यय येतो, तर 'होमसिक ब्रिगेड'सारख्या कादंबरीतून पाध्यांनी आपल्या जीवनविषयक धारणेला प्रादेशिक कृतितून मुक्त करून एक व्यापक संदर्भ दिला आहे.

मनोहर शहाणे यांनी आपल्या 'धाकटे आकाश' (1963), 'झाकोळ' (1965), 'देवाचा शब्द' (1968) आणि 'पुत्र' (1971) या चार कादंबऱ्यातून मध्यमवर्गीय जीवनातील कौंटुबिक ताणेबाणे सूक्ष्मरूपात चित्रित केले आहेत. 'धाकटे आकाश' मधील कुटुंब कथा ही  सहजपणे आणि वास्तववादी दृष्टीतून सादर होते. यातील व्यक्तिरेखा अधिकृत वाटतात, मानवी वाटतात आणि त्यांचे त्या त्या प्रसंगातले वागणे अपरिहार्य वाटते. 'देवाचा शब्द' मध्ये माधव आणि सुषमा या दांपत्याच्या कथैतून या संस्कृतीत आणि समाजात एका स्त्रीचा मूल न होण्यामुळे होणारा कोंडमारा दाखवला जातो. तर 'पुत्र' या कादंबरीत शहाणे वर्गीय जाणिवा आणि त्यातून निर्माण झालेली संस्कृती यांची मनःपूर्वक अवहेलना करतात.

'अरे संसार संसार', (प्रभाकर पेंढाकर, 1971), 'अंधारवाटा', (सुभाष भेण्डे, 1978) ह्याांमध्ये मुंबईतले समाजजीवन असूनही लैंगिकता टाळली गेलेली आहे. व. ह. पिटक्यांच्या 'शिदोरी' (1960) तून निव्वळ साखर कारखान्याच्या रूक्ष आशयद्रव्यातून अप्रतिम काव्यात्म गद्यशैली द्वारे कारखान्याच्या परिसरापुरतीच संरचना ठेवून तिथल्या दैनंदिन जीवनाचे तपशील ठासून भरलेले आहेत. दीनानाथ मनोहरांच्या 'रोबो' (1976) मध्ये काल्पनिकतेपेक्षा प्रत्यक्षाकडे जास्तीत जास्त ओढा दिसतो. सैनिकी जीवनात शिरणाऱ्या आधुनिक मनाची, त्या जीवनाविषयी आंग्लधार्जिनी चौकट तर उभी केलीच, शिवाय आधुनिक मिलिटरी संस्कृतीचे नैतिक मूल्यमापनही केलेले आहे.

अनंत कदम यांच्या 'किडे' (1971) मध्ये संज्ञाप्रवाहाचे तंत्र वापरून घरातल्या संगळयांना नकोशा झालेल्या तरूण बेकाराचे एका दिवसाचे तपशील सांगितलेले आहेत, तर 'स्त्रोत' मध्ये निव्वळ शुध्द माणूस म्हणून जगावसं वाटणाऱ्या, आंतरजातीय विवाह केलेल्या व जगाविषयी, स्वतःच्या संसाराविषयी फारशा अपेक्षा, हाव नसणाऱ्या तरूणाची बाहेरच्या मुलांचे आक्रोश पाहून होणारी अस्वस्थता येते. बायकोच्या बाळंतपणासाठी पैसे मिळवू शकत नसल्याचे सहजपणे सांगतो. या दोन्ही कादंबऱ्यातून कदमांनी आत्मक्लेशी निवेदकाची साध्या निवेदन तंत्रातून प्रखर वास्तव सांगण्याची प्रसन्न व निर्मळ शैली सामाजिक मूल्यांचे मोजमाप आपल्या उदार नैतिक दृष्टितून करते. नवकादंबरीतील वास्तवसन्मुखतेच्या विकासाचे हे खास उदाहरण होय.

किरण नगरकरांनी 'सात सक्कं त्रेचाळीस' मध्ये कुशंक पुरंदरेच्या रूपाने जीवनातील अर्थशुन्यता दाखविली आहे. तर त्र्यं. वि. सरदेशमुखांनी 'बखर एका राजाची' मधून एकाकीपणा मृत्यूचे चिंतन, मानवी संबंध आणि अस्तित्व, माणसाची अंधारयात्रा यांचा अनुभव उच्चकुलीन माणसाच्या आयुष्याला व्यापू शकतो हे दाखवून दिले आहे.

ह.मो. मराठेंच्या 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' (1972) ने आजच्या तरूण पिढीच्या हताश श्वासोच्छवासांचे समर्थ दर्शन घडविले आहे. माणसाच्या जीवनाला उलटे पालटे करण्याऱ्या बेकारी आणि पैशासारख्या गोष्टींचे वास्तव उघडे नागडे जीवनव्यापी दर्शन घडविले आहे. त्यांच्याच पुढील इतर कादंबऱ्या बहुतांशी पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करताना आलेल्या अनुभवांवर आधारित असून त्यांनी त्यातून एखाद्या धक्कादायक घटना वा बातमीचा आधार घेऊन त्या त्या क्षेत्रातील घडामोडींचा दंभस्फोट केला आहे.

नेमाडे, पाध्ये, नगरकर, मराठे, शहाणे इत्यादींच्या कादंबऱ्यांचा एकत्रित विचार करता नागर जीवनातील पडझडच या लेखकांनी शब्दबध्द केलेली

आहे. नागर जीवनाचे वास्तव दर्शन घडवून यांनी आपला एक वेगळा वास्तववाद मराठी कादंबरीत रूजवलेला दिसतो.

या सर्व पार्श्वभूमीवर मुक्तिबोधांचे कादंबरीविश्व आपल्या वेगळया गुणवैशिष्टयांनी उठून दिसते. व्यक्ती आणि समष्टी यांच्या परस्पर संबंधांचा वेध घेताना शरच्चंद्रानी वास्तववादी सूरच घेतलेला दिसतो. 'क्षिप्रा', 'सरहद्द', 'जन हे ओळतु जेथे' या तीन कादंबऱ्यांमधून त्यांनी व्यक्ती आणि काळ यांच्या परस्पर संबंधांचा वास्तववादी वेध घेण्याचा प्रयत्न तर केलाच शिवाय बिशूच्या जीवनाची भव्यतेकडे होणारी वाटचालच त्यातून रेखाटली आहे. विशूचा विकास ते एका ठळक, निश्चित काळाच्या पार्श्वभूमीवर करतात. शिवाय त्या काळातील विविध घडामोडी, चढउतार, आशा आकांक्षा, उद्रेक यांचे चित्रणही तितक्याच ताकदीने करतात. 'एका नाजूक, हळव्या, क्षिप्रेच्या काठाने वावरणाऱ्या बिशूचा विकास होत होत एका समृध्द समज, सामाजाभिमुख व्यक्तिमत्त्वामध्ये त्याचे रूपांतर होते. या तीनही कादंबऱ्यांतून अनेक माणसे भेटतात आणि जीवनाचे विविध प्रकार, आकार, वृत्ती वैशिष्ट्यो त्यांच्या रूपाने दिसू लागतात. या काळातले वास्तवही अनेक बाजूने वाढत असते, पसरत असते आणि जीवनाचे प्रवाहित्त्व दाखवित असते.'9 त्यांच्या अंतर्वेध येथे मुक्तिबोधांनी घेण्याचा प्रयत्न केला आहे.

### *(3:5 )प्रमुख स्त्रियांच्या कादंबऱ्या –*

मराठीतील प्रमुख स्त्री कादंबरीकरांमध्ये कमल देसाई आणि गौरी देशपांडे या दोन लेखिकांचा या संदर्भात विचार करता येईल. स्त्री जीवनाचे विविध पदर आणि परिमाणे सामाजिक, मानसिक, सांस्कृतिक, तात्त्विक अशा विविध पातळयांवर या दोन्ही लेखिकांनी अत्यंत धीटपणे उलगडून दाखविले आहे. कमल देसाईंचय कौटुंबिक कथानकातून अस्तित्त्वाचा चिरंतन आणि मूलभूत प्रश्नांचा वेध घेणारी त्यांची प्रतिभा व माणसाला घेरणाऱ्या सर्वव्यापी दु:खाचा शोध घेणारे मन यांचे दर्शन आपणास घडते. या सर्व मूलभूत शोधाच्या केंद्रस्थानी स्त्री आहे. वास्तवाच्या मुशीतून हे आकलन बाहेर येऊन वास्तव–अवास्तव, भौतिक–अतिभौतिक, शूभ–वर्तमान इत्यांदींच्या सीमारेषाच पुसून टाकते. 'रात्रं दिन आम्हा युध्दाचा प्रसंग' (1964) मध्ये राजकारण येते ते आशयाचा एक भाग म्हणून तसेच त्यांची पुढची एक कादंबरी 'काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई' (1975), ही दोन लघु कादंबऱ्यांनी युक्त असून समजायला अवघड असल्या तरी जीवनाच्या मूलाकारापर्यंत वाचकाला नेऊन त्याचे अस्तित्वभान प्रगल्भ करण्याचे वैचारिक सामर्थ्य आणि संस्कार त्यांच्या वाचनातून मिळते. गौरी देशपांडेंचा जीवनविषयक आकलनाचा आणि शोधाचा केंद्रविंदू स्त्री हाच आहे. ही स्त्री आधुनिक स्वतंत्र व मुक्त अशी असून व्यक्तिस्वातंत्र्य हे मूल्य जबाबदारीने गौरी देशपांडे प्रक्षेपित करतात. स्त्रीकडे माणूस म्हणून पाहण्याची दृष्टी त्यांच्या या कादंबऱ्यातून व्यक्त होते. 'कारावासातून पत्रे', 'एकेक पान गळावया', 'मध्य लटपटीत', 'निरगाठी', 'चंद्रिके गं सारिके गं', 'दुस्तर हा घाट', 'थांग', 'तेरूओ आणि कही दूरपर्यंत' या त्यांच्या लघु कादंबऱ्या म्हणजे आधुनिक वृत्तीच्या स्त्रीची स्वातंत्र्यसूक्तेच होत. परंतु या सर्वातून 'गौरी देशपांडेना समुहापेक्षा माणसाच्या मूलभूत आणि सनातन प्रश्नांमध्ये अधिक रस आहे. विचारांपेक्षा भावनांमधील उत्कटता त्यांना अधिक भावते. लेखिकेची ही मनोवृत्ती आदर्शवादी, रोमँटिक वृत्तीला जवळची आहे.'10 आणि शेवटी वास्तव प्रश्न घेऊन लिहिता त्याही शेवटी रोमँटीसिझमकडेच वळतात असे म्हणावे लागेल.

### *(4)समारोप –*

इथपर्यंतचा हा मराठीतील वास्तववादी कादंबरीचा आढावा घेताना, असे दिसून येते की, मराठीतील वास्तववादी कादंबरीचा खऱ्या अर्थाने विकास होऊ लागला तो 1960 नंतरच. कारण 1960 नंतर केवळ सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक अनुबंधच ढवळते गेले नाही तर, वाङ्मयीन वातावरणातही एक प्रकारची सरमिसळता, विविधता, क्रांतिकारकता आली. जीवन विषयक जाणिवांमध्ये विविधता आल्यामुळे, तिच्या अभिव्यक्तीमध्येही नवे प्रयोग करण्याची वृत्ती आलेली आहे. 'प्रत्येक लेखक आपल्या संवेदन क्षमतेनुसार जीवनदश्रन घडवत असतो. अनुभवाची जात आणि लेखकावर असलेले विविध संस्कार यातून आदर्शवादी वास्तववादी अथवा उपरोधपूर्ण साहित्य जन्माला येतं. यातून तयार झालेल्या एकात्म जाणिवेचं पृथ:करण केलं तर त्यात विविधरंगी प्रवाहांच्या अनेक छटा दिसतील. या छटा एकमेकात मिसळलेल्या आहेत, त्यांच्या सीमारेषा पुसट आहेत.'11 त्यामुळेच हा आढावा घेताना काही कादंबऱ्या यातून अनपेक्षितपणे वगळल्या गेल्या असतील वा काही इतर प्रेरणा प्रवृत्तीची झाक असलेल्या कादंबऱ्यांचाही समावेश झालेला दिसेल. अर्थात वास्तववादाची कास धरणाऱ्या या सर्व कादंबऱ्यांमध्ये काही संमिश्र कादंबऱ्याही येऊन जाणे अशक्यप्राय नाही. तेव्हा हे संक्षेपिकरण वा संक्रमण होणे क्रमप्राप्त होते हे लक्षात घ्यावे लागेल.

मराठी समीक्षेत या कादंबऱ्यांच्या नायकांना अस्तित्ववादी (Absurd man) प्रतिनायक अशा प्रवृत्तीने संबोधलेले दिसते. खरे तर हे नायक परंपरा झुगारणारे, बंडखोर, काहीसे नैराश्यवादी, वैफल्यग्रस्त वाटत असले तरी, त्यांच्याजवळ ध्येयवाद, उदात्तता, मानवतावाद, प्रीती, प्रणय इत्यादी खोटे वसाहतवादी चलन नव्हते. तर आहे ती परिस्थिती स्वीकारणे वा नाकारणे यापैकी एकच पर्याय त्यांनी निवडलेला दिसतो. व्यक्ती व समाज यांच्यामधील समस्यांबद्दल भाषिक कृती मांडणाऱ्या या कादंबऱ्यांची भिस्त पात्रावर नव्हतीच. पात्रांभोवतीच्या आवरणावर व्यक्ती व समाज ह्यांच्यातील परस्परावलंबी नात्यावर त्यांची भिस्त होती. अराजकते ऐवजी व्यवस्थेकडे यातील नायकांचा कल आहे. प्रत्यक्ष जीवनातील भाषा, वास्तव पात्र प्रसंग, उपरोधगर्भतेवर भर, अशा वैशिष्ट्यांनी या कादंबऱ्यांनी मराठी कादंबरीचे दालन समृध्द कले. मराठी कादंबरीत नवे आवर्तन सुरू झाले. ह्या आवर्तनातल्या कादंबरीकारांनी पंडिती समीक्षेला पायबंद घातला. वास्तववाद अंगीकारला. नवी आशयद्रव्ये निवडली, अवास्तव व्यक्तिवाद डावलून व्यक्ती व समाज यांच्यामधला दुवा वेधला. लौकिक व्यवहारातच सौदर्य शोधण्याची तंत्रे रूढ केली, नव्या सौदर्य कल्पना शेधल्या. 'वर्तमान जग सोडून भूतकाळात, किंवा अद्‌भुतात किंवा कल्पित वास्तवात जाण्याची गरज नसते, आहे त्या वास्तवातच सौंदर्य असू शकते, हे गेल्या वीस वर्षातल्या (1960–80) कादंबरीकरांनी प्रत्यक्ष सिध्द केले आहे.'12 हा नेमाड्यांचा उतारा या सर्व आढाव्यावर चांगला प्रकाश टाकू शकतो.

आपल्या अभ्यासविषय असलेल्या ह.मो. मराठे व प्रभाकर पेंढाकरांच्या सर्व कादंबरी विश्वाकडे पाहता, त्यांनीही आपापल्या परीने कादंबरी विषयाला अनुरूप असा वास्तववाद अंगीकारलेला दिसतो. नवनागर कादंबरीकारांमधील ह. मो. मराठे व अरूण साधू या दोहोंनी या नागर वास्तववादाचं चांगलं दर्शन घडवलेलं आहे. या संदर्भात, 'मराठे काय किंवा साधू काय हे या वास्तवाशी इतके एकरूप झालेले आहेत की कधी कधी समग्र वास्तव चित्रण या त्यांच्या मर्यादा तर ठरणार नाहीत ना!'13 अशी शंका दीपक घारे उपस्थित करतात. ह.मों.च्या 'इतिवृत्त', 'प्रास्ताविक', 'निष्पर्ण वृक्षावर...'सारख्या कादंबऱ्यात या अर्बन रिॲलिटीच फार चांगलं चित्रण झालेलं आहे. पेंढारकरांनीही 'अरे संसार संसार', 'रारंग ढांग' सारख्या कादंबऱ्यातून दोन वेगवेगळ्या पातळ्यांवरचे वास्तव, अस्सल जिवंत चित्रण केलेले आहे. अर्थात अस्सल आणि जिवंत वातावरण हे या दोन्ही कादंबऱ्यांचं वैशिष्ट्यां असूनही वास्तवदर्शन हा काही त्यांचा हेतू नाही. ते एक फक्त निमित्त आहे.

### *संदर्भ टीपा :*

1.कुरूंदकर नरहर, 'धार आणि काठ', देशमुख आणि कं.(पब्लिशर्स) प्रा.लि.पुणे, आ.3री 1993, पृ.9, मुल्य 250=00
2.उ.नि. 'धार आणि काठ', पृ. 35
3.नेमाडे भालचंद्र 'कादंबरी' (लेख) समा.पवार गो.मा. व इतर (संपा.), 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप' (1950–1975) पॉप्युलर प्र; मुंबई, आ. 1ली 1986, पृ. 17, मूल्य 150रु.
4.'प्रदक्षिणा' खंड 2रा, कॉन्टिनेन्टल प्र., पुणे, आ. 1ली, 1991, पृ.99–100. मुल्य 75=00
5.उ.नि. 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप', पृ. 26
6.उ.नि. 'प्रदक्षिणा', पृ. 119.
7.उ.नि. 'धार आणि काठ', पृ. 260
8.उ.नि. 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप', पृ. 59.
9.उ.नि. 'प्रदक्षिणा', पृ. 152.
10.घारे दीपक 'आजची मराठी कादंबरी' (1975 ते 1985), 'म.सा.पत्रिका'; म.सा. परिषद प्र., पुणे, एप्रिल–जून 1987, पृ. 8.
11.तैत्रव, पृ.6.
12.उ.नि. 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप', पृ. 52–53.
13.उ.नि. 'म.सा.पत्रिका', (एप्रिल–जून) 1987, पृ. 11.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✍ International Scientific Journal Consortium Scientific
- ✍ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- ✍Google Scholar
- ✍EBSCO
- ✍DOAJ
- ✍Index Copernicus
- ✍Publication Index
- ✍Academic Journal Database
- ✍Contemporary Research Index
- ✍Academic Paper Databse
- ✍Digital Journals Database
- ✍Current Index to Scholarly Journals
- ✍Elite Scientific Journal Archive
- ✍Directory Of Academic Resources
- ✍Scholar Journal Index
- ✍Recent Science Index
- ✍Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net